# आंदोलन

जोशू बाबांबरोबर सत्याग्रह आंदोलनात गेला होता.

त्याने घोषणा दिल्या, थाळया वाजवल्या,

देश-भाषाप्रेमाची गीतेही गायली.

ना त्याला जेवणाचे भान होते,

ना पाणी पिण्याचे, खाऊ खाण्याचे.

दणदण ओरडून जोशू शहारला होता, मोहरला होता.

गर्दीमध्ये जोशू गर्दीमय झाला होता.

> जोशू घरी आला तेव्हा जोशूला काही वेगळेच वाटत होते.
>
> आपण खरे-खुरे देशकार्य केले असे त्याला वाटत होते. लहाणपणीच त्याला मोठे झाल्यासारखे वाटते होते.
>
> जोशूने मोठेपणाच्या अंगणात पहिले पाऊल टाकले होते!